# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.७०६ दिनांक १५.०९.२०२०

## अफीम नावाचा अंमली पदार्थ बाळगणा-या आरोपीतास अटक

दिनांक १४/०९/२०२० रोजी १८.१० वाजता विरार पोलीस ठाणे हद्दीतील आर.जे. नाका, विरार पुर्व, ता.वसई, जि.पालघर येथे आरोपीत ओमप्रकाश भगाराम पटेल, वय २७ वर्षे, सध्या रा. नारंगी फाटक जवळ, विरार पुर्व मुळ रा.मु.पो.सर, ता.लोणी, जि.जोधपूर, राज्य राजस्थान याने त्याचे मारुती झेन कार क्रं. एम.एच-०४/ए एक्स-३२४० मध्ये एकुण २५० ग्रॅम वजनाचा अफीम नावाचा अंमली पदार्थ बेकायदेशीर रित्या विक्री करीता ताबे कब्जात बाळगून मिळून आला. आरोपीत याचे ताब्यातुन १)१,२५,०००/- रु किंमतीची एकुण २५० ग्रॅम वजनाचा अफिम नावाचा अंमली पदार्थ परदर्शक प्लास्टीक पिशवी मध्ये मिळुन आलेला कि.सु.२) १,५०,०००/- रु एक लाल रंगाची मारुती झेन कार क्रं. एम एच-०४/ए एक्स-३२४० कि.सु. असा एकुण २,७५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीत याचे विरुध्द विरार पोलीस ठाणे गु.र.नं. ॥ ८०३/२०२० एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८(क), २२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीत यास दिनांक १४/०९/२०२० रोजी २३.१६ वाजता अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक श्री.रविंद्र नाईक, प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा, पालघर यांचे मार्गदशनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

Scanned with CamScanner